


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ ▮ अंक २२ ▮ शुक्रवार ९ ऑक्टोबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# परराज्यातील विदेशी मद्यावर महाराष्ट्राचे बनावट लेबल!

## भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई, पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परराज्यातील विदेशी मद्याच्या बाटल्यांवरील मूळ लेबल्स काढून त्यावर महाराष्ट्रातील उत्पादनाचे बनावट लेबल्स लावून विक्री करण्याचा काळाबाजार भिंगार कॅम्प पोलिसांनी उघडकीस आणला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी विविध नामांकित कंपन्यांच्या विदेशी दारूच्या बाटल्यांसह तब्बल १ लाख ९७ हजार ७४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका तरुणाला ताब्यात घेण्यात आले असून मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे. यामध्ये मोठे रॅकेट असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दिनांक ८ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजता सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांना गोपनीय माहिती मिळाली की, एसबीआय चौक, छत्रपती शिवाजी महाराज संकुल परिसरात एक इसम अवैध दारूची वाहतूक करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून संशयित इसमास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याने आपले नाव प्रशांत बाबासाहेब पांढरे (वय २६, रा. पांढरे मळा, नागरदेवळे, अहिल्यानगर) असे सांगितले. त्याच्याकडील मद्याच्या बाटल्यांबाबत कसून चौकशी केली असता, हा साठा प्रदीप फडतरे (रा. केकती भिंगार, अहिल्यानगर) याच्याकडून आणल्याचे निष्पन्न झाले.

अधिक तपास केला असता, परराज्यातून स्वस्त दरात आणलेल्या बाटल्यांवरील मूळ लेबल्स हटवून त्यावर महाराष्ट्रातील अधिकृत उत्पादनाचे खोटे लेबल्स लावून विक्री केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकून एक लाख ९७ हजार ७४५ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

### पथकात यांचा सहभाग

या कारवाईत पोलिसांनी मॅजिक मोमेंट्स, रॉयल चॅलेंज, इम्पीरियल ब्लू, ओल्ड मंक, रॉयल स्टॅग, फिनिशर, आयकॉनिक व्हाईट या विदेशी कंपन्यांचे लेबल असलेला मद्यसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), ३४१(२), ३(५) सह महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पोलीस अंमलदार योगेश पवार, सतीश भांड, मोहन भेटे, राम मोरे, प्रमोद लहारे, संदीप थोरात आणि कैलास शिरसाठ यांच्या पथकाने केली.




नवरात्र उत्सव अवघा एका दिवसावर आला असल्याने केडगाव येथील रेणुकामाता मंदिर येथे उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. (छाया– राजू खरपुडे ,नगर )

# दुष्काळाच्या झळांतही मोहटादेवी गड हिरवाईने नटला!

## टँकरचे पाणी अन् ठिबक सिंचनातून वृक्षसंवर्धन; शारदीय नवरात्रोत्सवासाठी देवस्थान सज्ज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी–** यंदा पावसाने दडी मारल्याने शेवगाव-पाथर्डीसह संपूर्ण परिसरात दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. पाणीटंचाईच्या झळा ग्रामीण भागाला सोसाव्या लागत असताना प्रसिद्ध श्री मोहटादेवी गड परिसर मात्र हिरवाईने नटला आहे. रखरखत्या उन्हात आणि प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही गडावरील झाडांनी धरलेली हिरवीगार पर्णसंभाराची छटा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. देवस्थान विश्वस्त मंडळाने काही वर्षांपूर्वी केलेले वृक्षारोपण, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि ठिबक सिंचनाच्या माध्यमातून केलेले नियोजनबद्ध वृक्षसंवर्धन यामुळे गड परिसराला निसर्गरम्य स्वरूप प्राप्त झाले आहे.



मोहटादेवी गडावर काही वर्षांपूर्वी देवस्थान समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले होते. मात्र, केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेली झाडे जगविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. पाण्याची उपलब्धता कमी असतानाही टँकरद्वारे पाणी देणे आणि ठिबक सिंचनाच्या साहाय्याने झाडांचे संगोपन करणे, यावर भर देण्यात आला. त्यामुळे आज गड परिसरात सर्वत्र हिरवाई पाहायला मिळत असून, निसर्ग आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम येथे अनुभवायला मिळत आहे.

**वृक्षसंवर्धनाच्या नियोजनाला यश**

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे महत्त्व अधोरेखित होत असताना मोहटादेवी गडावरील वृक्षसंवर्धनाचे काम विशेष उल्लेखनीय ठरत आहे. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे नियमित संगोपन आणि पाण्याचे नियोजन केल्यास प्रतिकूल परिस्थितीतही हिरवाई टिकवून ठेवता येते, याचे उदाहरण

▮ पान ४ वर

# अवैध मावा तयार करणाऱ्या चार अड्ड्यांवर एलसीबीचे छापे

## पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त, चार स्वतंत्र गुन्हे दाखल






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शेवगाव आणि तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीरपणे सुगंधी मावा तयार करून विक्री करणाऱ्या चार अड्ड्यांवर छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी एकूण २ लाख ७६ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अंमलदारांची दोन विशेष पथके तयार करून कारवाईसाठी रवाना केली. पथकाने ९ ऑक्टोबर रोजी शेवगाव व तोफखाना परिसरात गुप्त माहितीच्या आधारे छापे टाकले.

शेवगावात आबासाहेब कचरू तुजारे (वय ३५, रा. वरूर) याला ताब्यात घेतले, तर वासुदेव नामदेव पुरणाळे (रा. भगूर) हा फरार झाला.

तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत केलेल्या कारवाईत ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सागर मारुती लोखंडे (वय ३७, रा. वैदुवाडी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तोफखाना हद्दीतील दुसऱ्या कारवाईत ९० हजार ४०० रुपयांचा साठा जप्त करून लवअंकुश आण्णा धनगर (वय ३०, रा. वैदुवाडी) यास अटक करण्यात आली.

तोफखाना हद्दीतील तिसऱ्या कारवाईत ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, या प्रकरणी अजित आण्णा उर्फ टायसन शिंदे (वय २७, रा. वैदुवाडी) याला ताब्यात घेण्यात आले, तर आण्णा उर्फ टायसन पंढरीनाथ शिंदे फरार झाला.

संशयितांवर भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# गुरुकुल तालीम भाळवणीच्या तीन मल्लांना कुस्तीत सुवर्णपदके; अंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भाळवणी–** काष्टी येथील परीक्रमा महाविद्यालय येथे (दी.९ ऑक्टोबर) रोजी झालेल्या अंतर महाविद्यालयीन ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत गुरुकुल तालीम भाळवणीच्या मल्लांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदकांची कमाई केली. निलेश उचाळे यांनी( ८२ कि वजनी गट ), प्रतीक रोहकले( ६७कि. वजनी गट )आणि पै. हर्षद रोहकले यांनी (६०कि वजनी गट ) यांत अव्वल स्थान पटकावले.

या यशामुळे तिघांचीही शिरूर येथे होणाऱ्या अंतर विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तालमीच्या मल्लांनी मिळवलेल्या या यशामुळे भाळवणी परिसरात आनंदाचे वातावरण आहे. या खेळाडूंना राष्ट्रीय कुस्ती पंच व कुस्ती मार्गदर्शक पै. गणेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यांच्या नियमित सरावामुळे आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणामुळे हे यश मिळाल्याचे बोलले जात आहे. तिन्ही मल्लांचे परिसरातून नागरिकांन कडून अभिनंदन होत असून, आगामी विभागीय स्पर्धे साठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# मक्तापूर आरोग्य उपकेंद्राच्या उत्कृष्ट कामकाजावर नागरिक समाधानी; आरोग्य सेविकांच्या तत्पर सेवेचे सर्वत्र कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा सहज व वेळेत मिळाव्यात यासाठी कार्यरत असलेले नेवासा तालुक्यातील मक्तापूर येथील आरोग्य उपकेंद्र सध्या आपल्या उत्कृष्ट सेवेमुळे चर्चेत आले आहे. उपकेंद्रात मिळणाऱ्या दर्जेदार आरोग्य सुविधा आणि कर्मचाऱ्यांची तत्परता यामुळे स्थानिक नागरिकांमधून अत्यंत समाधान व्यक्त केले जात असून, येथील आरोग्य सेविकांच्या कार्याचे विशेष कौतुक होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून मक्तापूर आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून गरोदर मातांची तपासणी, बालकांचे लसीकरण, रुग्ण तपासणी आणि तातडीच्या प्राथमिक उपचारांच्या सुविधा अतिशय नियोजित पद्धतीने पुरवल्या जात आहेत. आरोग्य सेविकांनी केवळ उपकेंद्रातच नव्हे, तर घरोघरी जाऊन आरोग्यविषयक जनजागृती करणे आणि नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सल्ला देणे यावर भर दिला आहे.

### टीबी मुक्त अभियानात मक्तापूर उपकेंद्र तालुक्यात प्रथम!

केंद्र सरकारच्या टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत ज्या आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात दोनपेक्षा कमी रुग्ण आढळले, त्यामध्ये मक्तापूर आरोग्य उपकेंद्राने संपूर्ण नेवासा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.या उत्कृष्ट कामगिरीबद्दल उपकेंद्राची विशेष निवड करण्यात आली आहे. आरोग्य सेविकांनी घरोघरी जाऊन केलेली आरोग्य तपासणी, रुग्णांना मोफत औषधोपचार पुरवणे आणि नियमित पाठपुरावा करणे यामुळेच हे यश शक्य झाले असून, संपूर्ण परिसरातून आरोग्य कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

**तत्पर सेवा आणि आपुलकीचे नाते**

उपचारात दाखवला जाणारा आपुलकीचा दृष्टिकोन आणि नियमित पाठपुरावा यामुळे ग्रामस्थांचा उपकेंद्रावरील विश्वास वाढला आहे. ''कोणत्याही वेळी मदत लागल्यास आरोग्य सेविका तत्परतेने उपलब्ध असतात. योग्य मार्गदर्शन आणि नियमित उपचार मिळत असल्याने आम्हाला मोठ्या रुग्णालयांत जाण्याची गरज भासत नाही,'' अशा भावना मक्तापूरच्या ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे उपकेंद्राचा कारभार अधिक लोकाभिमुख झाला असून, प्रशासनाकडूनही या उपक्रमांचे कौतुक केले जात आहे. ग्रामीण आरोग्याचा दर्जा उंचावण्यात मक्तापूर उपकेंद्राची कामगिरी इतर केंद्रांसाठी आदर्श ठरत आहे.

# भारतीय वंशाच्या नवी पिल्लईंना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर

**मुंबई–** यंदाच्या नोबेल पुरस्कारासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव चर्चेत होते. विशेष म्हणजे, त्यांनी स्वत: देखील आपणास शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला पाहिजे, अशी इच्छा बोलून दाखवली होती. मात्र, यंदाही डोनाल्ड ट्रम्प हे स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. मूळ भारतीय वंशाच्या आणि मूळ दक्षिण आफ्रिकेतील नवनेथम नवी पिल्लईंना यंदाचा नोबेल पीस प्राईज म्हणजेच शांततेचा नोबेल जाहीर झाला आहे.

यंदाच्या शांतता नोबेल पुरस्कासाठी महिलेला सन्मानित करण्यात आले असून आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या काळात त्यांनी वर्णभेदविरोधी कार्यकर्त्यांची बाजू मांडली आणि कैद्यांवरील अत्याचारांचे मुद्दे उपस्थित केले.

नोबेल समितीतर्फे शांतता आणि आंतरराष्ट्रीय

▮ पान ४ वर

### रसायनशास्त्राचा नोबेल संयुक्तपणे जाहीर

जगभरात अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्कारांची घोषणा सुरू झाली आहे. यंदाचा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार फ्रान्सचे शास्त्रज्ञ हेन्री बी. कागन आणि जपानचे शास्त्रज्ञ केन्सो सोई यांना संयुक्तपणे जाहीर झाला आहे. नॉन लिनियर इफेक्ट्स आणि स्व-उत्प्रेरण या क्षेत्रातील त्यांच्या क्रांतीकारी शोधासाठी रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसकडून हा सर्वोच्च बहुमान देण्यात आला आहे.

## दै. आकर्षण निवडक

### राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व आनंदऋषी नेत्रालयातर्फे १७५ विद्यार्थ्यांची बाल नेत्र तपासणी



अहिल्यानगर - राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर आणि आनंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे लहान मुलांमधील तिरळेपणा तसेच विविध नेत्रविकारांच्या तपासणीसाठी विशेष बाल नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये राहुरी व नगर तालुक्यातील जिल्हा परिषद तसेच महानगरपालिका शाळांमधील नेत्रविकार आढळलेल्या १७५ विद्यार्थ्यांची सविस्तर नेत्र तपासणी करण्यात आली. पेडियाट्रिक ऑप्थल्मॉलॉजिस्ट डॉ. रमा कलंत्री तसेच आनंदऋषी नेत्रालयच्या ऑप्टोमेट्रिस्ट टीमने विद्यार्थ्यांची तपासणी केली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या पथकाने शाळांमध्ये केलेल्या प्राथमिक तपासणीमध्ये नेत्रविकार आढळलेल्या विद्यार्थ्यांना पुढील तपासणी व उपचारासाठी या शिबिरात संदर्भित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची दृष्टी, तिरळेपणा तसेच इतर बाल नेत्रविकारांची तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांना पुढील उपचार किंवा शस्त्रक्रियेची आवश्यकता आढळून आली, त्यांना आनंदऋषी नेत्रालय येथे आवश्यक उपचार व शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. बालवयातील नेत्रविकारांचे वेळेवर निदान व उपचार झाल्यास भविष्यातील दृष्टीदोष टाळण्यास मोठी मदत होते. या उद्देशाने आनंदऋषी नेत्रालय आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने हा बाल नेत्र आरोग्य उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. तालुकास्तरावर शाळांमध्ये नेत्र तपासणी करून नेत्रविकार आढळलेल्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ तपासणी, आवश्यक उपचार तसेच शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ''प्रत्येक बालकाला निरोगी दृष्टी मिळावी आणि त्याचे भविष्य उज्ज्वल व्हावे, या उद्देशाने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यापर्यंत बाल नेत्रसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे,'' असे आनंदऋषी नेत्रालयच्या वतीने सांगण्यात आले.

### प्रतिभावान शिक्षक आणि गुणी विद्यार्थी हीच शाळेची खरी श्रीमंती - डॉ. रमेश झरकर



मिरजगाव - विद्यालयाच्या प्रगतीमध्ये प्रतिभावान शिक्षक आणि विद्यार्जन करणारे गुणी विद्यार्थी असतील,तर लौकिक अर्थाने शाळा श्रीमंत होण्यास वेळ लागणार नाही.असे मत विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर यांनी व्यक्त केले.भारत विद्यालय मिरजगाव येथे आदर्श शिक्षक कल्याण गवारे आणि महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, तसेच तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र गोरे,माजी प्राचार्य जयवंत मेहत्रे,आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक कल्याण गवारे,प्रज्ञाशोध परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी,खेळाडू तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी विद्यालयाची वाढत असलेली गुणवत्ता आणि विद्यालय त्यासाठी करत असलेले प्रयत्न याविषयी माहिती दिली. विद्यालयाच्या प्रगतीबद्दल उपस्थित पालकांनीही समाधान व्यक्त करत विद्यालयासाठी लागणाऱ्या मदतीचे आश्वासन दिले.महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जिल्हास्तरीय यादीमध्ये समाविष्ट झालेली कु. पूर्वा वायाळ हिने आपल्या यशामध्ये आई-वडिलांबरोबरच विद्यालयातील शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. त्याचबरोबर ट्रेसेबल गिव्हिंग फाउंडेशन हाँगकाँग या फाउंडेशनचे सर्वेसर्वा श्री. नरेश सुराणा व सौ.सीमा सुराणा यांच्याकडून विद्यालयासाठी मिळत असलेल्या शैक्षणिक साहित्याचा व पुस्तकांचाही मोठा वाटा असल्याचे तिने आवर्जून सांगितले.आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले विद्यालयाचे शिक्षक श्री.कल्याण गवारे यांनी आपल्याला मिळालेल्या पुरस्काराबद्दल दैनिक लोक परिवर्तन,तसेच हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व विद्यालयाचे चेअरमन या सर्वांचे आभार व्यक्त केले.

## हिवरे कोरड्यात मळगंगा मातेच्या नवरात्रोत्सवाला रविवारपासून प्रारंभ

**दुष्काळाच्या संकटातून तारण्यासाठी ग्रामस्थांचे देवीचरणी साकडे; पाणी-चाऱ्याचा प्रश्न गंभीर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** हिवरे कोरडा (ता. पारनेर) दिनांक ११/१०/ २६ पासून येथील ग्रामदैवत मळंगादेवी मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, यंदा पावसाने ओढ दिल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांना भीषण दुष्काळाचा सामना करावा लागत आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई आणि शेतीसमोरील संकटे अशा गंभीर परिस्थितीत ग्रामस्थांनी मळंगामातेच्या चरणी साकडे घातले आहे. ''आई मळंगामाते, आमच्यावरील संकटे दूर कर, पाऊस पडू दे आणि या कठीण परिस्थितीला सामोरे जाण्याची शक्ती दे,'' अशी आर्त प्रार्थना ग्रामस्थांकडून केली जात आहे.

हिवरे कोरडा येथील मळंगादेवी हे परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवी नवसाला पावणारी असल्याची भाविकांची श्रद्धा असून, नवरात्रोत्सवात देवीच्या दर्शनासाठी परिसरातील भाविक मोठ्या भक्तिभावाने उपस्थित राहतात. यंदाही मंदिरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दुष्काळाचे सावट; पाणी जपून वापरण्याचे आवाहन यंदा पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने परिसरातील शेती आणि पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. पाण्याचे स्रोत आटत चालल्याने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करणेही शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान बनले आहे. शेती, पशुधन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अशा अनेक आघाड्यांवर शेतकरी संघर्ष करत आहेत.

## गौतम निधीचे कार्य निरंतर वाढण्यासाठी प्रयत्न करावे - पूज्य प्रविणऋषीजी महाराज

**आनंद तीर्थ समवशरण येथे गौतम निधी फौंडेशनचे राष्ट्रीय अधिवेशन उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अर्हम् विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या गौतम निधी फौंडेशनचे १९ वे राष्ट्रीय अधिवेशन आनंद तीर्थ समवशरण येथे बुधवारी पार पडले. या अधिवेशनात गौतम निधी फौंडेशनचे देशभरातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. फौंडेशनच्या कार्याचा विस्तार करत समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा, शिक्षा, विकास आणि संस्कार पोहचवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सान्निध्यात झालेल्या या अधिवेशनास गौतम निधी फौंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष पंकज फुलफगर (छत्रपती संभाजीनगर), राष्ट्रीय कार्यकारिणीचे अनिल नहार, सुनील नहार, नितीन संकलेचा, संतोष ललवानी, पवन भंडारी, सुरेश गांधी, किरण बोरा (सर), प्रमुख अतिथी न्यायाधीश बोरा, न्यायाधीश ताथेड, समर्पण चातुर्मास कमिटीचे अशोक (बाबूशेठ) बोरा, गौतम निधी अहिल्यानगरचे अध्यक्ष जवाहर कटारिया , दिलीप कटारिया, संदीप देसरडा, प्रविण कटारिया, सुनील बोरा, विलास कटारिया व सर्व सदस्य उपस्थित होते.

पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, गौतम निधी फौंडेशनचे कार्य सकल संघासाठी आहे. प्रगत झालेल्यांनी काही कारणांनी मागे असलेल्या समाजातील परिवारांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. गरजूंना आरोग्यासह इतर सेवा उपलब्ध करून देताना मुलांना चांगल्या शिक्षणासाठी मदतीचा हात देणे आवश्यक आहे. या कार्याचा सतत विस्तार झाला पाहिजे. त्यामुळे जास्तीत जास्त परिवारांना याचा लाभ होईल. विशेषतः ग्रामीण भागातील परिवारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अधिक लक्ष केंद्रित करावे. गौतम निधी फौंडेशनचे कार्य निरंतर वृद्धिंगत होऊन शेवटच्या घटकापर्यंत पोहचेल अशी व्यवस्था निर्माण करावी. फौंडेशनच्या कार्यात महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा यासाठी कार्यकारिणीत किमान ३० टक्के महिलांना स्थान असेल. तसेच अध्यक्ष, महामंत्री, कोषाध्यक्ष यापैकी किमान एका पदावर महिला विराजमान असेल. दरवर्षी एक तृतीयांश कार्यकारिणी सदस्य निवृत्त होऊन त्यांच्या जागी नवीन लोकांना संधी दिली जाईल. समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचून त्याच्या गरजा लक्षात घेऊन मदतीचा हात देणे हे उद्दिष्ट समोर ठेवून सर्वांनी काम करावे.

स्वागत करताना अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले, आज उपाध्यायश्रींचा जन्मदिन आहे. जिनशासनाचे महान विचार समाजात रूजवण्याचे कार्य गुरूदेव करत असून भविष्यातही हे कार्य अखंड चालू राहील. त्यांचे अनमोल विचार समाजाला निरंतर मिळत राहतील अशा भावना व्यक्त करत बोरा यांनी गुरूदेवांचे अभिष्टचिंतन केले. समाजाला दातृत्वाचे संस्कार देताना समाजातील गरजूंना सेवा, संस्कार, शिक्षणासाठी मदत करण्याचे मोठे कार्य फौंडेशन गुरूदेवांच्या मार्गदर्शनाखाली करत आहे. समर्पण चातुर्मासात या अधिवेशनासाठी आलेल्या देशभरातील सर्व प्रतिनिधींचे आचार्यश्रींच्या भूमीत स्वागत आहे.

प्रास्ताविकात पंकज फुलफगर यांनी सांगितले की, उपाध्यायश्रींच्या प्रेरणेतून सन २००६ मध्ये पुण्यात गौतम निधी फौंडेशनची स्थापना झाली. आज देशातील ९ राज्यात तसेच विदेशात मिळून २०० हून अधिक शाखा कार्यरत आहेत.

## शेतात काम करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लुटले; पैठण पोलिसांकडून आरोपी जेरबंद

**मोटारसायकलवरून पाठलाग करून महिलेला अडवले; स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई, चोरीचे सोन्याचे दागिने जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** शेतात काम करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून पळ काढणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावला. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्या साथीदारासह आणखी एका फरार आरोपीचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास पैठण तालुक्यातील आगापूर शिवारात एक महिला शेतात पाणी देण्याचे काम करीत होती. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी शेताजवळ तीन ते चार चकरा मारल्या. त्यानंतर त्यांनी अचानक दुचाकी थांबवून महिलेजवळ जात तिला धाक दाखवला. महिलेच्या अंगावरील गळ्यातील सोन्याची पोत, कानातील फुले आणि कुडक्या जबरदस्तीने काढून घेत आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६८/२०२६, भारतीय न्याय संहिता () कलम ३०९(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय सिंग राजपूत यांनी तपासासाठी स्वतंत्र पथक तयार केले. पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध सुरू केला. तपासादरम्यान रोहित पवार याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

पोलिसांनी आरोपी रोहित निल्या पवार (रा. चंदनापुरी, ता. अंबड, जि. जालना) तसेच त्याचा नातलग फयाज ऊर्फ सल्ल्या शेख ऊर्फ संतोष काळे (रा. साकोरेगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांच्याबाबत माहिती दिली असून, आणखी एक आरोपी फरार असल्याचे प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय सिंग राजपूत, सपोनि वैभव रणखांब, पोलीस अंमलदार लहू थोटे, संतोष पाटील, अनिल काळे, गणेश ठाकणे तसेच तांत्रिक विश्लेषण पथकातील कर्मचाऱ्यांनी केली. शेतात काम करणाऱ्या महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या घटनेचा पोलिसांनी छडा लावल्याने नागरिकांकडून कारवाईचे स्वागत होत आहे.

## भिंगारमध्ये रंगणार ३५० वर्षांची परंपरा जपणारा शाहिरांचा कलगीतुरा!

**आई जगदंबेच्या पालखी-पलंग भेटीनिमित्त १३ ऑक्टोबरला सरपण गल्ली येथे रंगणार शाहिरांचा मेळा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भिंगार येथे सालाबादप्रमाणे शारदीय नवरात्र उत्सव आणि आई जगदंबेच्या पालखी-पलंग भेटीनिमित्त तिसऱ्या माळेला मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी शाहिरांच्या पारंपरिक कलगीतुऱ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भिंगार येथील सरपण गल्लीमध्ये रात्री ८.३० वाजता हा कार्यक्रम रंगणार आहे.

सुमारे ३५० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या कलगीतुऱ्याच्या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपला जातो. शाहिरांच्या सवाल-जवाबांनी, काव्यात्मक सादरीकरणाने आणि लोककलेच्या रंगतदार आविष्काराने हा मेळा रसिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

या पारंपरिक लोककला सोहळ्याला महाराष्ट्रातील सर्व शाहिरांनी तसेच लोककलेवर प्रेम करणाऱ्या रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊ कर्डिले यांनी केले आहे.

## भाळवणीच्या पिराचा मळ्यात बिबट्या जेरबंद

**भीतीचे सावट दूर । ग्रामस्थांचा सुटकेचा निश्वास**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भाळवणी–** भाळवणी येथील पिराचा मळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून वावरत असलेला बिबट्या अखेर वनविभागाच्या पथकाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. त्यामुळे परिसरातील शेतकरी, महिला व ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. शेतात काम करणारे शेतकरी, मजूर तसेच लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. रात्रीच्या वेळी शेतात पाणी देण्यासाठी जाणेही धोक्याचे वाटत होते. ग्रामस्थांनी याबाबत वनविभागाला माहिती देताच तातडीने पाहणी करून परिसरात पिंजरा लावण्यात आला.

पारनेर प्रादेशिक वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन धाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल यू. पी. खराडे, वनरक्षक बी. एस. दवणे (भाळवणी) तसेच किशोर गुंजाळ यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवली. बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याचे समजताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि सुरक्षितरित्या बिबट्याला ताब्यात घेण्यात आले. जेरबंद केलेल्या बिबट्याची आवश्यक ती तपासणी करून त्याला पुढील कार्यवाहीसाठी नेण्यात आले. वनविभागाच्या तत्पर कार्यवाहीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## एमपीएससी पेपरफुटीप्रकरणी शिवप्रहार संघटना आक्रमक; अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुणे येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या प्रकरणावरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवप्रहार संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष भीमनवार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील कथित गैरप्रकारांमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. विद्यार्थी मोठ्या मेहनतीने, वेळ आणि आर्थिक खर्च करून परीक्षांची तयारी करतात. मात्र, परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जाण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी भूमिका शिवप्रहार संघटनेने मांडली.

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची तातडीने निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार घडू नयेत, यासाठी परीक्षा व्यवस्थेतील सुरक्षा उपाययोजना अधिक सक्षम कराव्यात आणि संपूर्ण परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करावी, असेही संघटनेने नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास शिवप्रहार संघटना हा मुद्दा राज्यभर उपस्थित करून लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारेल, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या गंभीर प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना शिवप्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के यांच्यासह संदीप संसारे, संदीप सायंबर, सागर घोरपडे, शिवा शिंदे, नितीन ढाळे, विकी निकरड, अभिजीत भांडवलकर, अमित कचरे, सागर खळे, अतुल चौधरी, प्रशांत सराईकर, बंडू भोसले, शिवम देवगुणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### लहान मुलांसाठी अहिल्यानगरमध्ये 'किड्स गरबा नाईट २०२६'चे आयोजन

अहिल्यानगर - नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने लहान मुला-मुलींसाठी खास 'किड्स गरबा नाईट २०२६ सीझन ३'चे आयोजन करण्यात आले आहे. कोहिनूर मॉल, डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट आणि नृत्य आस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार असून, कोहिनूर मॉलचे सहकार्य लाभले आहे. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सावेडी येथील कोहिनूर मॉलच्या एट्रियममध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या विशेष गरबा नाईटमध्ये ३ ते १५ वर्षे वयोगटातील मुले-मुली पारंपरिक गरबा व दांडिया नृत्याचा आनंद घेणार आहेत. नृत्य, दांडिया, मनोरंजन, स्पर्धा आणि उत्साहाने परिपूर्ण असा हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमापूर्वी दि. १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान लहान मुलांसाठी पाच दिवसांची विशेष गरबा-दांडिया कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सावेडी येथील प्रोफेसर चौकातील डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूटच्या स्टुडिओमध्ये सायंकाळी ५ ते ६ आणि ६ ते ७ अशा दोन सत्रांमध्ये होणार आहे. कार्यशाळेसाठी ३ ते ५ वर्षे वयोगटातील टॉडलर्स, ६ ते १० वर्षे वयोगटातील सब-ज्युनिअर आणि ११ ते १५ वर्षे वयोगटातील ज्युनिअर असे गट करण्यात आले आहेत. गरबा नाईटमध्ये उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट गरबा सादरीकरण, उत्कृष्ट दांडिया सादरीकरण, गरबा प्रिन्स, गरबा प्रिन्सेस, उत्कृष्ट द्वयी सादरीकरण तसेच मुलगा व मुलगी अशा गटांमध्ये विशेष विजेतेपदाची पारितोषिके देण्यात येणार आहेत. सर्व सहभागी मुलांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी नोंदणी अनिवार्य असून, इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांची नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन आयोजक डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूटचे संचालक सागर अलचेट्टी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९६३७१३९५५२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### शिवपाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर सोमवारी अहिल्यानगरमध्ये नियोजन बैठक!

अहिल्यानगर- राज्यातील शेतकऱ्यांच्या हक्काचे शिवपाणंद शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करून त्यांचे प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने सोमवारी दि. १२ ऑक्टोबर अहिल्यानगर येथे संवाद व नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृहात होणाऱ्या या बैठकीत शेतरस्त्यांचे सीमांकन, कायमस्वरूपी हद्दखुणा, रस्त्यांचे मजबुतीकरण, सिमेंट काँक्रिट रस्त्यांची निर्मिती आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. गाव नकाशावर नोंद असलेल्या शेतरस्त्यांच्या प्रत्यक्ष जागेवरील हद्दी निश्चित करणे, अतिक्रमणामुळे बंद झालेले शिवपाणंद रस्ते खुले करणे आणि सीमांकनानंतर कायमस्वरूपी हद्दखुणा बसविण्याच्या प्रक्रियेला गती देणे, या प्रमुख विषयांवर बैठकीत भर दिला जाणार आहे. शेतरस्त्यांच्या प्रश्नांसाठी शेतकऱ्यांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाणार आहे.शेतरस्त्यांसंदर्भातील प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत, यासाठी 'मिशन झिरो पेंडन्सी'च्या धर्तीवर कालमर्यादेत कार्यवाही करण्याचा आग्रह बैठकीत धरण्यात येणार आहे. तालुकानिहाय प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेणे, सीमांकनाच्या कामांना गती देणे आणि संबंधित शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय वाढविण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करण्यावर चर्चा होणार आहे. राज्यातील शेतरस्त्यांच्या विकासासाठी समान निकष, समान निधी आणि एकसमान कार्यपद्धती लागू करण्याची भूमिका चळवळीच्या वतीने मांडण्यात येणार आहे.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात उद्योजकता परिसंवाद उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे वाणिज्य विभागाच्या वतीने उद्योजकता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादासाठी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर येथील प्रा. शिवाजी पठारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर होते.

या परिसंवादामध्ये विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व, व्यवसायाच्या विविध संधी, स्वयंरोजगार, व्यवसाय नियोजन आणि रोजगारनिर्मिती याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींचा विचार न करता स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. नवीन संकल्पना, आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर यशस्वी उद्योजक बनता येते, असे मार्गदर्शन प्रा. शिवाजी पठारे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुदाम वीर यांनी केले. त्यांनी उद्योजकता विकासामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याची गरज अधोरेखित केली. पाहुण्यांचा परिचय प्रा. अंकिता भूनिया यांनी करून दिला.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन उद्योजकतेच्या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करावे, असे आवाहन केले. अशा परिसंवादांमुळे विद्यार्थ्यांना व्यवसायविषयक ज्ञान मिळण्याबरोबरच स्वावलंबनाची प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक वविद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनुराधा गायके यांनी केले, तर आभार प्रा. प्रियांका आंबेकर यांनी मानले. वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित या परिसंवादातून विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.

## विद्यार्थ्यांनी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी - कॉम्रेड ॲड. शैलेंद्र कांबळे




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वर्तमान परिस्थितीमध्ये देशात सर्वत्र असंतोषाचे वातावरण आहे. जुन्या पिढीला मरगळ आलेली असताना विद्यार्थ्यांनी संघर्षाची तयारी ठेवली पाहिजे. प्रसंगी आता फक्त तरुण पिढी अन्यायाच्या विरोधात रस्त्यावर उतरून क्रांती करू शकते. उज्वल भविष्यासाठी त्यांनी हा संघर्ष करणे गरजेचे आहे. असे विचार कॉम्रेड ॲड. शैलेंद्र कांबळे यांनी न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मध्ये कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त आयोजित राज्यस्तरीय वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. ०६ व ०७ ऑक्टोबर २०२६ असे दोन दिवस ही स्पर्धा महाविद्यालयात पार पडली आहे. यावर्षी स्पर्धे चे हे अडतिसावे वर्ष आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र दरेसाहेब यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी वर्तमानाचा विचार करून निर्भीडपणे आपले म्हणणे मांडले पाहिजे. फक्त स्पर्धेसाठी म्हणून न बोलता स्पष्ट बोलण्याची भूमिका ठेवली पाहिजे. असे आवाहन स्पर्धकांना केले.

याप्रसंगी त्यांनी कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या आठवणींना उजाळा दिला. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ही भागवत साहेबांच्या विचारांनी चालवली जाणारी संस्था आहे. त्यांनी जो विचार पेरला त्याच विचारांची मानसे सध्या संस्थेत कार्यरत आहेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी अ.जि.म.वि.प्र.समाज संस्थेच्या खजिनदार मा. ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, कार्यकारणी सदस्या निर्मलाताई काटे तसेच शेवगाव,पाथर्डी, नगर येथील भागवतांवर प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते व भागवत कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.बी. सागडे यांनी केले.

## पत्रकारांना एक लाख रुपयांचे अपघाती विमा कवच; अभिनव उपक्रम

**सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या उपक्रमाचे कौतुक**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

कोपरगाव– लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना वृत्तांकनासाठी ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता कर्तव्य बजावावे लागते. बहुतांश पत्रकारांचा प्रवास दुचाकीवरून होत असल्याने प्रवासादरम्यान अपघाताची शक्यता असते. अशा वेळी उपचारांचा मोठा खर्च तसेच कुटुंबाची होणारी धावपळ लक्षात घेता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांना देण्यात आलेले अपघाती विमा कवच हा निश्चितच अभिनव उपक्रम आहे, असे गौरवोद्गार कोपरगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी काढले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कोपरगाव तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील ५० हून अधिक पत्रकारांचा प्रत्येकी एक लाख रुपयांचा अपघाती विमा काढण्यात आला आहे. या विमा संरक्षणासह संघटनेच्या ओळखपत्रांचे वाटप नुकतेच जिल्हा उपाध्यक्ष जनार्दन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली तसेच गोदामाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदिनाथ ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले यावेळी दळवी बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांनी केले. त्यांनी संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच संघटनेच्या कार्यविस्ताराची माहिती दिली. आदिनाथ ढाकणे यांनी संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष जनार्दन जगताप यांनी संघटनेची माहिती देत ओळखपत्राचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका सचिव विनोद देवरे यांनी केले, तर आभार प्रमोद पवार यांनी मानले. यावेळी शहराध्यक्ष हफिज शेख, कचरू लोहकरे, संजय लाड, रहीम पठाण, विशाल लोंढे, मिलिंद विघे, महेश गायकवाड, योगेश रुईकर, अनिल दीक्षित, सुनील ससाणे, योगेश डोखे, सोमनाथ डफळ, रवी वाघडकर, राजेंद्र तासकर, सतीश जाधव, अक्षय काळे, अमोल गायकवाड, शहाबाज कुरेशी आदी तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

> **पत्रकारांच्या अपघाती विम्याची संकल्पना खरोखरच अभिनव असून यातून जर कधी काही विपरीत घटना घडली तर कुटूंबाला मदत मिळू शकते त्यामुळे या उपक्रमासाठी कोपरगाव तालुका पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो.**
>
> **डॉ. विश्वासराव आरोटे**
> **महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघ प्रदेश सरचिटणीस**

## मोठा तरीही साधा,दिलदार माणूस



हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील दमदार अभिनेता, दिग्दर्शक आणि रंगभूमीशी घट्ट नातं असलेले नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५व्या वर्षी निधन झालं. आज (गुरुवार, ८ ऑक्टोबर) सकाळी गोव्यात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन,पुणे यांनी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे भारताचे माजी कर्णधार क्रिकेटपटू श्री चंद्रकांत बोर्डे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. एम.सी.ए चे अध्यक्ष श्री अजय शिर्के यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास श्री नाना पाटेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याच्या आयोजनात माझाही सहभाग होता. नानांचा आनंददायी सहवास मला लाभला होता. नाना सांस्कृतिक क्षेत्रात दिग्गज व्यक्तिमत्व असतानाही सहजपणाने संवाद साधत त्यांच्यातील आपलेपणाने हे व्यक्तिमत्व कायम स्मरणात रहावे असे होते.

नाना गेले यावर विश्वास बसत नाही
जीवनाचा अर्थ समजलेले नाना अचानक
आपल्यातून आपल्यासाठी खूप काही सोडून
गेले...
त्यांचा जिवंत अभिनय, त्यांच्यातील साधेपण,
त्यांची संवेदनशीलता, स्वतःसाठी पुरेल एवढंच
ठेवत समाजाला भरभरून देणारे नाना गेले...
नाही विश्वास बसत... नाना खरंच गेले
तो माणूस सर्वांसाठी प्रेरणा होता
लोकांसाठी केलेलं काम हा त्यांचा आनंद होता,
समाधान होतं..
आजकालच्या भौतिक सुखाच्या मागे लागणाऱ्या
जगात... केवळ पैसा हेच सुख मानणाऱ्या
या खोट्या जगात... माणुसकी, प्रेम, आनंद,
वेदना, जिव्हाळा हरवलेल्या आपल्या जगात
नाना आदर्श माणूस होता नाना जगले...
त्यांनी समाजावर, निसर्गावर मनापासून भरभरून
प्रेम केलं... आपण थोडस जरी नाना सारखं
अवलंबल तर त्यातील खरा आनंद आपणच
मिळवणार आहोत...खूप खोटं खोटं जगलो...
वागलो कळलच नाही आजपर्यंत नेमकं जगायचं
तरी कसं..? ना स्वतःवर कधी प्रेम केलं...
जिथे राहिलो, वाढलो ज्या मातीने आपल्याला
गोंजारल... सुगंध दिला...
त्या शहरावर तरी कधी आपण प्रेम केलं का..?
दिसेल तिथे ओरबाडायच... लुटायच
लक्तरे काढायची... हो, हेच केलं आपण...
आपल्या आत डोकावून पाहू या... स्वतःशी
बोलू या.. थोडं नाना बनून
पाऊस होऊ या.....!

**जयंत येलुलकर,**
**रसिक ग्रुप, अहिल्यानगर.**
**मा.मॅनेजिंग कमिटी मेंबर, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे**

## सेवा संकल्प अभियानांतर्गत अंगणवाडीतील बालकांना खाऊवाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सामाजिक कार्याला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत नगरसेविका शितलताई ढोणे यांच्या वतीने बागडपट्टी येथील अंगणवाडीमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी अंगणवाडीतील बालकांना खाऊचे वाटप करण्यात आले, तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा साडी-चोळी देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय सुवासिनींसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला.

अंगणवाडी शाळा ही बालकांच्या संस्काराचे आणि शिक्षणाचे माहेरघर आहे. बालवयात मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम होतो. आजची बालके ही उद्याच्या उज्ज्वल भारताचे भविष्य आहेत. हे भविष्य घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम अंगणवाडी सेविका आणि मदतनीस प्रामाणिकपणे करतात. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत त्यांचा सन्मान करण्यात आल्याचे नगरसेविका शितलताई ढोणे यांनी सांगितले.

अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी प्रयत्न केले जातात. बालकांना योग्य आहाराबाबत मार्गदर्शन केले जाते. तसेच पालकांना वेळोवेळी मुलांच्या शिक्षणाविषयी, आरोग्याविषयी आणि त्यांच्या विविध समस्यांविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले जाते. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना योग्य संस्कार, शिक्षण आणि मार्गदर्शन मिळवून देण्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही शितलताई ढोणे यांनी नमूद केले.

सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित या कार्यक्रमात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. बालकांना खाऊचे वाटप करण्यात आल्याने अंगणवाडीतील बालगोपालांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. तसेच उपस्थित सुवासिनींच्या सहभागातून हळदी-कुंकवाचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला.

यावेळी कालिंदी केसकर, अंगणवाडी सेविका शारदा बिज्जा, कल्याणी तनपुरे, शितल शिंदे, अश्विनी बागडे, जयश्री पेंन्टा, रूपाली गोसके, सुवर्णा चन्ना, मीना अंध्याल, महेश्वरी शेरला, वैष्णवी शेरला, सुनीता बिज्जा, अश्विनी गवते, अंजली गवते, सुकन्या सुरवसे, मनीषा ढोणे, वृषाली धोत्रे, शोभा राठोड, शोभा गायकवाड, पूजा घोलप, रचना गुगळे, सुवर्णा पाथरकर आदींसह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गावर पथदिवे बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १७ मध्ये नगरसेवक मनोज कोतकर यांच्या स्थानिक विकास निधीतून शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गावर पथदिवे बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या पथदिव्यांमुळे केडगाव देवी परिसरातील रहिवासी, विद्यार्थी, प्रवासी आणि भाविकांना रात्रीच्या वेळी सुरक्षितपणे ये-जा करण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे. नगरसेवक मनोज कोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

अहिल्यानगर शहरात कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध विकासकामांच्या माध्यमातून शहराची विकसित शहराकडे वाटचाल सुरू आहे. प्रभाग क्रमांक १७ हा नव्याने विकसित होणारा भाग असून, येथील मूलभूत प्रश्न सोडविण्यापासून ते शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत नगरसेवक मनोज कोतकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या भुयारी मार्गामुळे केडगाव देवी परिसरातील नागरिकांना जवळचा पर्यायी मार्ग उपलब्ध झाला आहे.



मात्र, रात्रीच्या वेळी भुयारी मार्गावर अंधार असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत होता. ही अडचण लक्षात घेऊन मनोज कोतकर यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून पथदिवे बसविण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळीही या मार्गाचा सुरक्षितपणे वापर करता येणार आहे. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, शास्त्रीनगर रेल्वे भुयारी मार्गामुळे केडगाव देवी परिसरातील नागरिकांना तसेच भाविकांना दळणवळणासाठी सुरक्षित आणि जवळचा मार्ग उपलब्ध झाला आहे. या मार्गावर पथदिवे बसविण्यात येत असल्याने रात्रीच्या वेळी प्रवास करणे अधिक सुरक्षित होईल. केडगाव देवी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांनाही या मार्गाचा लाभ होणार आहे. अहिल्यानगर शहरातील नागरिकांनी या सुविधेचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, महानगरपालिकेचा प्रभाग क्रमांक १७ हा नव्याने विकसित होणारा परिसर असल्याने येथे मूलभूत सुविधांपासून विविध विकासकामे करावी लागत आहेत. ही कामे नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी पद्धतीने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे एकाच कामासाठी वारंवार खर्च करण्याची वेळ येणार नाही. आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून परिसरातील विविध विकासकामे मार्गी लागत आहेत. शास्त्रीनगर येथील रेल्वे भुयारी मार्ग तयार व्हावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आणि त्याला यश आले. आता हा मार्ग नागरिकांच्या दळणवळणासाठी खुला झाला आहे. मात्र, रात्रीच्या वेळी येथे अंधार असल्याने पथदिवे बसविण्याची आवश्यकता होती. त्यामुळे महापालिकेच्या माध्यमातून पथदिवे बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील नागरिक आणि प्रवाशांना सुरक्षित व जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

नवरात्रोत्सवात केडगाव देवी यात्रेदरम्यान पोलीस प्रशासनाकडून रस्त्यावर बॅरिकेड्स लावण्यात येतात. त्यामुळे शास्त्रीनगर परिसरात राहणाऱ्या नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

### तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळमंडई येथील मंदिरात

# शारदीय नवरात्र उत्सवनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या दाळमंडई येथील तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने शारदीय नवरात्र उत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टच्या अध्यक्षा निता लोखंडे यांनी दिली.

या शारदीय नवरात्र निमित्त रविवार दि ११ रोजी दु. १२ वा. घटस्थापना, सोमवार दि. १२ रोजी स.दैनंदिन पुजा व संध्याकाळी ७.३० आरती, मंगळवार दि १३ रोजी दु.३ वा. श्री देवीची नित्योपचार महापुजा-कुंकुमार्चन कार्यक्रम,बुधवार दि.१४ रोजी श्री देवीची नित्योपचार महापुजा- आरती, गुरुवार दि.१५ रोजी श्री देवीची नित्यपूजा-ललित पंचमी -दुपारी ३ वाजता दुर्गा भजनी मंडळाचा कार्यक्रम ,शुक्रवार दि १६ रोजी श्री देवीची नित्यपूजा दुपारी ४ वाजता सप्तपदी पाठ ,शनिवार दि १७ रोजी श्री देवीची नित्यपूजा, रात्री ७ वाजता श्री तुळजापुरच्या तुळाजाभवानी पालखी मिरवणुक व पालखी आगमन रविवार दि १८ रोजी श्री देवीची नित्यपूजा सोमवार दि १९ रोजी दुर्गाष्टमी श्री देवीची नित्योपचार महापूजा आरती आणि दुपारी ७.३० वाजता वैदिक होमास प्रारंभआणि सकाळी ७ वा ३० मि पूर्णाहुती कुमारिका पूजन रात्री ८ वाजता मंगळवार दि २० रोजी विजयादशमी (दसरा) श्री देविची नित्योपचार महापूजा, संध्या. ७ वा. सिमोलंघन मंदिराभोवती पालखी मिरवणूक व मंचकी निद्री असे कार्यक्रम होतील.

तसेच दररोज दु.४ वाजता श्री सरस्वती भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, दररोज संध्याकाळी देवीची संबळ वादनावर आरती होणार आहे. तसेच ९ दिवस देवीची विविध रुपे साकरण्यात येणार आहे. तरी या शारदीय नवरात्र उत्सावानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहण्याचे आवाहन उपाध्यक्षा शोभना धारक यांनी केले आहे.

नवरात्र उत्सव यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या अध्यक्षा सो निता लोखंडे , उपाध्यक्षा सौ शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर ,खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे ,मनोज क्षिरसागर ,सागर काळे, दत्तात्रय डोळसे, गोकुळ कोटकर आदी प्रयत्नशिल आहे. वरील सर्व कार्यक्रम तिळवण तेली समाज ट्रस्टच्या श्री संताजी भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तेली पंचाचा वाडा, दाळमंडई येथील होतील.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर – फुलचंद बाठिया

**। मोफत दंतरोग तपासणी, जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिर**
**। श्रीमती मदनदेवी लुंकड यांचा वाढदिवस आरोग्य शिबीराने साजरा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. जैनसोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने व मानवसेवेच्या दृष्टिकोनातून आरोग्य सेवेचे कार्य करीत आहे.श्रीमती मदनदेवी लुंकड या मातोश्री असून ३६ वर्षांपूर्वी पतीच्या निधनानंतर त्यांनी प्रमुख आधारस्तंभ बनून सर्व परिवाराला मार्गदर्शन केले आहे.तसेच या मातोश्रींचे आशीर्वाद व संस्कार परिवाराला लाभले असल्याने त्यांचा जन्मदिवस आरोग्य शिबिराचे माध्यमातून साजरा होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे.त्यांच्या अपार कष्टातून सर्व परीवाराचे जीवन समृद्ध झाले आहे.मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.असे समजून आरोग्य शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर असून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात नेहमीच सहकार्य राहील.असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक फुलचंद बाठिया यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये श्रीमती मदनदेवी उत्तमचंद लुंकड (वाकोडीकर)यांच्या ९४ व्या जन्म दिनानिमित्त मोफत दंतरोग तपासणी,जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक फुलचंद बाठिया,दिलीप रुणवाल, सौ.चंचलाबाई बाठिया, सौ.जयश्रीबाई रुणवाल,संजय लुंकड,गिरीश लुंकड, कचरदास लुंकड,दिलीप लुंकड,रमेश लुंकड,अनिल लुंकड,अभय लुंकड,अतुल लुंकड,अजित लुंकड, दिव्यांश लुंकड,अनिल दुगड आदींसह जैन सोशल फेडरेशन चे डॉ. वसंत कटारिया,डॉ.प्रकाश कांकरिया,संतोष बोथरा, अभय गुगळे,सतीश लोढा, डॉ.आशिष भंडारी,सुभाष भंडारी,वसंत चोपडा,

शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.पारितोष वारे,डॉ.अर्पणा पवार,डॉ.प्राची गांधी,डॉ.तृप्ती डुंगरवाल,मॅक्सी लोफेशियल सर्जन डॉ.मृदुला मुळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,श्रीमती मदनदेवी लुंकड यांचा ९४ वा जन्मदिवस आरोग्य शिबीराने साजरा होत आहे.आदर्श वाढदिवस कसा साजरा करावा याचे हे उत्तम उदाहरण आहे.मातोश्री मदनदेवी लुंकड या अत्यंत धार्मिक असून नित्य देवाचे नामस्मरण करीत आहेत.त्यांच्या संस्कारातून लुंकड परिवार हा सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.त्यांची शंभरावी साजरी करण्याचे भाग्य आम्हाला मिळो. त्यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्यांना सामाजिक कार्य करण्याची ऊर्जा मिळत आहे.तसेच त्यांचे जावई पुणे येथील उद्योजक फुलचंद बाठिया यांनी सतरा अठरा वर्षापासून आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर पुणे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे.तसेच त्यांना सेवा कार्याची आवड असल्याने पूर्वीपासूनच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग आहे.लुंकड परीवारा सारखे दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल चे सेवा कार्य प्रगतीपथावर आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात उद्योजक फुलचंद बाठिया यांचे मोठे योगदान लाभले आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डेंटल विभाग परिपूर्ण झालेला आहे. महिन्यातून दोन वेळा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शिबिरे घेण्यात येत आहे.या शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना दिलासा मिळत आहे.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयात आनंद मेळ्याची धूम! विद्यार्थ्यांची ८० हजारांहून अधिक उलाढाल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षणासोबतच व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे, कल्पकतेला वाव देणे आणि स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखा व एच.एस.एस.सी. व्होकेशनल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आनंद मेळा व फनफेअर उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांची विक्री करत आपल्या व्यावसायिक कौशल्यांचे दर्शन घडविले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी तब्बल ८० हजार रुपयांहून अधिकची उलाढाल केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महाविद्यालयाच्या प्रांगणात आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते आनंद मेळा व फनफेअरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे, प्रा. राजेंद्र जाधव, प्रा. प्राजक्ता भंडारी, प्रा. रंजना डिके, प्रा. कल्याण मुरकुटे, प्रा. किरण वाघमोडे, प्रा. संजय जाजगे, प्रा. चंद्रकांत फसले, प्रा. नितीन पानसरे, प्रा बाबासाहेब आडसुळ, प्रा. प्रमिला तांबे, प्रा. दत्तात्रय आहेर, प्रा. अनिता चव्हाण, प्रा. गणेश भगत, प्रा. संजय अकोलकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून २५ ते ३० स्टॉल्स उभारले होते. या स्टॉल्सवर ज्यूस, केक, कुल्फी, विविध स्नॅक्स, भेळ, इडली, चहा, पाणीपुरी, समोसे, इडली-सांबार, पापडभाजी, वडापाव यांसह विविध गोडधोड पदार्थांची विक्री करण्यात आली. याशिवाय जीवनोपयोगी वस्तूंचे स्टॉल्सही आकर्षणाचे केंद्र ठरले.

विद्यार्थ्यांनी पदार्थांची केलेली आकर्षक मांडणी, ग्राहकांशी संवाद साधण्याची पद्धत, वस्तूंचे दर ठरविणे, विक्रीचे नियोजन आणि व्यवहार हाताळण्यातील कौशल्य यामुळे या मेळ्याला चांगला प्रतिसाद मिळाला. केवळ खाद्यपदार्थ तयार करणेच नव्हे, तर त्यांची विक्री करून आर्थिक व्यवहाराचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळाली. ‘कमवा व शिका’ या संकल्पनेला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व, पैशांचे नियोजन, ग्राहकांच्या गरजा आणि व्यवसायातील नियोजनाचे महत्त्व समजून घेता आले. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांचे आणि मेहनतीचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता शिक्षणासोबत व्यावहारिक ज्ञान आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण आणि नवनवीन कल्पना असतात. या गुणांना योग्य दिशा देऊन प्रत्यक्ष कृतीत आणल्यास स्वावलंबनाचा मार्ग खुला होऊ शकतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले.

अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमता ओळखण्याची, निर्णय घेण्याची आणि उपलब्ध साधनांचा योग्य वापर करण्याची संधी मिळते. व्यवसाय करताना नियोजन, मेहनत, कल्पकता आणि ग्राहकांशी संवाद साधण्याचे कौशल्य महत्त्वाचे असते. आनंद मेळ्यासारख्या उपक्रमांतून या गुणांचा विकास होऊन विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास मिळतो, अशी भूमिका त्यांनी मांडली.

# आयएमएस येथे बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांचा फ्यूजन २०२६ कार्यक्रम उत्साहात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बी. पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.) येथे बीबीए व बीसीए विभागाचा ‘फ्यूजन २०२६’ हा उपक्रम ‘इनक्रेडिबल इंडिया’ या संकल्पनेवर उत्साहात संपन्न झाला.

सर्जनशीलता, कौशल्य आणि टीम स्पिरिटचा उत्सव या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पोस्टर प्रेझेंटेशन, अॅड-मॅड शो, टॅलेंट स्पेक्ट्रम, टीम कनेक्ट, बेस्ट इंटर्न स्पर्धा, रील स्पर्धा आणि फूड स्टॉल अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रमांत उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत आपल्या प्रतिभेची, सर्जनशीलतेची तसेच भारतीय संस्कृती आणि विविधतेची उत्कृष्ट झलक सादर केली.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे प्रभारी संचालक डॉ.प्रणोती तेलोरे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, नेतृत्वगुण, समूह कार्य तसेच भारतीय मूल्ये आणि संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले. सल्लागार डॉ. एम. बी. मेहता यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, त्यांची सर्जनशीलता आणि टीम वर्क यांचे कौतुक करत त्यांना दाद दिली.

आय.एम.एसचे प्रभारी संचालक डॉ.प्रणोती तेलोरे, सल्लागार डॉ. एम. बी.मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांच्या हस्ते विविध उपक्रमांचे विजेते आणि उपविजेते यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. विविध उपक्रमांच्या निकालांमध्ये सॅक्रेड तामिळनाडू या संघाने कॅप्टन वैष्णवी मोरे यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट कामगिरी करत ‘फ्यूजन २०२६’ चे विजेतेपद पटकावले. तर दिव्यांका तलरेजा या विद्यार्थिनीने ‘बेस्ट इंटर्न अवॉर्ड’ मिळवण्याचा मान मिळवला.

बीबीए विभाग प्रमुख डॉ. हर्षवर्धन भावसार आणि बीसीए विभाग प्रमुख डॉ. सय्यद मुदस्सर यांच्या संयोजनातून कार्यक्रमाचे प्रभावी नियोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीबीए विभागातील प्रा. शितल नाबरिया, प्रा. सायली तोरणे, प्रा. वरद हातवळणे, प्रा. तृप्ती कोठारी, प्रा. भक्ती जग्गी तसेच बीसीए विभागातील प्रा. स्वाती ठोंबरे, प्रा. अश्विनी बाराथे, प्रा. अजित कुटे, प्रा. अलसबा इनामदार आणि प्रा. इरम खान यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या योगदानामुळे फ्यूजन २०२६ हा उपक्रम अधिक रंगतदार, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

**भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांकडून पाहणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या नवरात्रोत्सवासाठी देवस्थान ट्रस्टकडून जय्यत तयारी करण्यात आली असून, दरवर्षी शहरासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरातील कायदा व सुव्यवस्था तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी श्री रेणुका माता देवस्थान मंदिराची पाहणी केली. यावेळी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सव काळात भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आली. भाविकांची गर्दी, वाहतूक व्यवस्था, मंदिर परिसरातील शिस्त, सुरक्षितता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक त्या बंदोबस्ताबाबत पोलिस अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरात दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक येत असल्याने गर्दीचे नियोजन, वाहनांची ये-जा आणि भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येणार आहे. यासाठी देवस्थान ट्रस्ट आणि पोलिस प्रशासन यांच्यात समन्वय ठेवण्यावर बैठकीत भर देण्यात आला. नवरात्रोत्सवाची सुरुवात रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी देवीची मिरवणूक काढून प्राणप्रतिष्ठापना करण्याने होणार आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांसाठी विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, होमहवन, आकर्षक विद्युत रोषणाई, देवीचा गोंधळ तसेच महाप्रसाद आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाला धार्मिक वातावरणासोबतच सामाजिक उपक्रमांचीही जोड मिळणार आहे. भाविकांना दर्शनासाठी येताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उत्सव काळात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने सर्वांनी प्रशासन व देवस्थान ट्रस्टला सहकार्य करून शिस्तीचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

या बैठकीस देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी उपस्थित होते. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांसोबतच आरोग्य, रक्तदान आणि पर्यावरण संवर्धनासारखे सामाजिक उपक्रम राबवून श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टने उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली जात आहे.

# अहिल्यानगरला बाराबलुतेदार महासंघातर्फे शिवाजी महाले यांची जयंती साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर शिलेदार मावळे शिवरत्न जिवाजी महाले यांची ३९१ वी जयंती अहिल्यानगर येथील बारा बलुतेदार महासंघातर्फे साजरी करण्यात आली. महासंघाचे जिल्हाध्यक्ष माऊली गायकवाड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कार्याध्यक्ष अनिल इंगळे,सहसचिव चंद्रकांत पुंड, जिल्हा संघटक सुधीर पुंड, जिल्हा सरचिटणीस राजहंस देसाई, शहर कार्याध्यक्ष भानुदास बनकर, नवनाथ खेडकर, मुकुंद शिंदे, गणेश पांड्याल, बापूसाहेब फुंदे, आबासाहेब कदम, संतोष भालेराव, सागर नांदुरकर, आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माऊली गायकवाड यांनी शिवरत्न जिवाजी महाले यांच्या बाबत इतिहास थोडक्यात सांगितला. ‘‘होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी‘‘ ही म्हण कशी प्रचलित झाली तर छत्रपती शिवाजी महाराजांचे शूर शिलेदार मावळे म्हणून जिवाजी महाले यांची ओळख होती. प्रतापगडाच्या युद्धा दरम्यान अफजलखानाचा वध केल्यानंतर त्याचा सरदार सय्यद बंडा याने शिवाजी महाराजांवर वार केला तेव्हा जिवाजी महाले यांनी अत्यंत चतुराईने प्रसंगावधान राखून तो वार आपल्या अंगावर झेलत त्याचाही पराभव केला. यावेळी महाराजांचे प्राण वाचले व तेव्हापासून होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी ही म्हण प्रचलित झाली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

(पान १ वरून)

## दुष्काळाच्या झळांतही मोहटादेवी गड हिरवाईने नटला!

गड परिसराने घालून दिले आहे. गडावरील प्रसन्न वातावरणामुळे भाविकांना देवीच्या दर्शनासोबतच निसर्गरम्य परिसराचा आनंदही घेता येणार आहे.

**रविवारपासून शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ**

येत्या रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ पासून मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. या उत्सवासाठी पुढील पंधरा दिवस राज्याच्या विविध भागांतून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येण्याची अपेक्षा आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गडावरील हिरवागार परिसर, प्रसन्न वातावरण आणि धार्मिक उत्साह यामुळे भाविकांना भक्तिमय अनुभव मिळणार आहे.

नवरात्रोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी श्री जगदंबा देवी सार्वजनिक देवस्थानाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन घेता यावे, यासाठी दर्शनरांगांचे नियोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुरक्षा बंदोबस्त आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. उत्सवाच्या काळात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन संबंधित विभागांकडून विविध सोयी-सुविधांची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

**अध्यक्ष नवनाथ जगताप यांच्याकडून तयारीचा आढावा**

नवरात्रोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप आणि विश्वस्त मंडळाने दोन दिवसांपूर्वी मोहटादेवी गड परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विविध विभागांची विशेष बैठक घेऊन उत्सवाच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

गडावर येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी, पिण्याच्या पाण्याची पुरेशी उपलब्धता असावी आणि परिसरात स्वच्छता व सुरक्षितता कायम राहावी, यासाठी अध्यक्ष नवनाथ जगताप यांनी संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. नवरात्रोत्सवाच्या काळात सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून भाविकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही देण्यात आले.

**भाविकांच्या स्वागतासाठी मोहटागड सज्ज**

दुष्काळी परिस्थितीतही जपलेली हिरवाई आणि नवरात्रोत्सवासाठी करण्यात आलेली व्यापक तयारी यामुळे मोहटादेवी गड भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. देवीच्या दर्शनासाठी राज्यभरातून येणाऱ्या भाविकांनी शारदीय नवरात्रोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतीय वंशाच्या नवी पिल्लईंना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर

कायद्याला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल नवनेथम नवी पिल्लईंना २०२६ चा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आलाय. यंदाच्या वर्षी २०२६ चा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवण्याच्या स्पर्धेत पोप लियो, इंटरनेशनल क्रिमिनल कोर्ट आणि फिलिस्तीनी क्षेत्रातील विशेष प्रतिनिधि प्रमुख दावेदार होते. यंदाचा नोबेल पीस प्राइज आपल्यालाच मिळायला हवा, असे त्यांनी म्हटले होते. त्यामुळेच, पुरस्काराची घोषणा झाल्यानंतर त्यांनी निवड समितीवर आक्षेप घेतला आहे.